**आदेश**

क्र.नियोजन/स्थाविका/प्रमा-२०१०-११/१४९२
जिल्हा नियोजन समिती,
जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली.
दिनांक :- ०४/१२/२०१०.

**विषय :- प्रशासकीय मान्यता**
**वर्ष २०१०-२०११ आमदार स्थानिक विकास कार्यक्रम**

वाचा :- १. नियोजन विभागाचा शासन निर्णय क्रं.स्थाविका २००४/प्र.क्रं.२७/का.१४४५,दि. १९.०४.२००४
२. या कार्यालयाचे पत्र क्रं.नियोजन/आ/टाईप प्लान/२००५-०६/३७१ दि.१०.८.२००५
३. मा. आमदार श्री.राजीव सातव,कळमनुरी यांचे पत्र दि.१५.०६.१०, २७.०५.१० व २६.०९.१०

कळमनुरी विधानसभा मतदार संघासाठी सन २०१०-११ या आर्थिक वर्षात मा. आ. श्री. राजीव सातव यांनी त्यांचे आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत प्रस्तावीत केल्यानुसार अनुज्ञेय असलेल्या निधीच्या मर्यादेत विवरणपत्र "अ" मध्ये नमूद केल्याप्रमाणे एकुण रु. ८५.०२ लाख किंमतीच्या २७ कामांना संबंधित यंत्रणेस खालील अटीच्या अधिन राहून प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

सदरील कामे कार्यान्वयन अधिकारी यांनी पुढील अटी व त्रुटींची पुर्तता केल्यावर पूर्ण करावयाची आहेत.

१. सदर कामांच्या अंदाजपत्रकांना संबंधित कार्यान्वयीन अभिकरणांनी तांत्रिक मंजूरी दिली. असल्याने तसेच प्रस्तावातील घेण्यांत आलेले वाहतुक दर योग्य व अचुक असल्या बाबत,व अंदाजपत्रक अदयावत दरसुचीने केले आहे या बाबतची व ईतर तांत्रिक बाबींची संपूर्ण जबाबदारी कार्यकारी अभिकरणाची राहील.
२. प्रस्तावीत कामे ज्या जागेवर करावयाचे आहे ती जागा शासनाच्या मालकीची/स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीची असल्याचे खात्री करुनच कामास प्रत्यक्षात सुरुवात करावी अन्यथा याची सर्वस्वी जवाबदारी संबधित यंत्रणेची राहील.
३. प्रशासकीय मान्यता दिलेले कामे अंदाजपत्रकात नमुंद केलेल्या तांत्रिक मान्यतेप्रमाणेच तसेच दिलेल्या दर्शक नकाशा प्रमाणेच करणे आवश्यक आहे. अन्यथा याची सर्वस्वी जबाबदारी संबधित यंत्रणेची राहील.
४. या कार्यक्रमांतर्गत मंजूर कामे सोबतच्या १ वर्षाच्या कालावधीत पूर्ण करणे कार्यान्वयीन यंत्रणेवर बंधनकारक राहिल.
५. सदरची कामे या व अन्य कार्यक्रमामधून यापुर्वी घेण्यात आली असल्यास ही मंजुर कामे सुरु करु नयेत अशा परिस्थीतीत याची माहीती संबधित लोकप्रतीनिधीस / या कार्यालयास अवगत करावी व पुढील कोणतीही कार्येवाही करण्यांत येऊ नये अन्यथा याची सर्वस्वी जवाबदारी संबधित यंत्रणेची राहील.
६. ज्या कामास या आदेशाद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. त्या कामास प्रत्यक्ष सुरुवात करण्यापुर्वी हे काम कोणत्याही पाटबंधारे/जलविघुत/पाणी पुरवठा प्रकल्पाच्या जलाशयाखाली किंवा अन्य बांधकामामध्ये जाणार नाही किंवा अशा प्रकल्पाचा या कामावर कोणताही परिणाम होणार नाही याची पुन्हा खात्री करुन घ्यावी.
७. या कार्यक्रमाखाली येणा-या खर्चाचा हिशोब स्वतंत्रपणे ठेवण्यात यावा आणि खर्चाचा प्रगती अहवाल या कार्यालयास महिना संपल्यानंतर पुढील महिन्याच्या पाच तारखेपर्यत पाठवावा. काम पूर्ण झाल्यानंतर उपयोगिता प्रमाणपत्र व पुर्णत्वाचा दाखला सादर करण्यात यावा.
८. काम संपल्यानंतर कामाचे परिरक्षण/देखभाल करण्यासाठी संबंधीताच्या ताब्यात दयावे व तसे या कार्यालयास कळवावे. काम सुरु करण्यापुर्वी सर्व संबधितांकडुन ना हरकत प्रमाणपत्र तसेच देखभाल व दुरुस्तीचे हमी पत्र घेतल्यानंतरच प्रत्यक्ष कामास सुरवात करावी.
९. काम सुरु करणेपुर्वी व काम पुर्ण झालेनंतर कामाचे ठिकाणाचे फोटो काढून या कार्यालयास सादर करावेत, तसेच कामाचे ठिकाणी नावाचा बोर्ड बसवावा.
१०. कार्यकारी यंत्रणेने कामांस प्रशासकीय मान्यता दिलेल्या रकमेत काम करावे,प्रशासकीय मान्यतेपेक्षा जास्त खर्च करु नये. प्रशासकीय मान्यता रक्कमेपेक्षा जास्तीचा खर्च केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.
११. सामाजिक सभागृहाचा आराखडा (या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्रं.७ नुसार) चिफ आर्किटेक्ट, महाराष्ट्र राज्य, सार्वजनिक बांधकाम विभाग मुंबई यांचे टाईप डिझाईन (टी.ए.डी.एम./ ५५१०) व शासकीय वास्तु विशारद यांनी मंजुर केलेला आराखडा वापरण्यात यावा.
१२. रस्त्याचे काम करताना आवश्यक crust thickness ती आहे याची खात्री करून नंतर कॉंक्रिट करण्यात यावे. अंदाजपत्रकास क्वारी चार्ट जोडण्यात यावा.



(क्रि.मा.पृ.)

१३. या कार्यक्रमावर येणारा खर्च २०१०-२०११ या वित्तीय वर्षात खालील लेखा शिर्षाखाली होणाऱ्या तरतुदीतुन भागविण्यात यावा व त्याच लेखाशिर्षाखाली खर्च टाकण्यात यावा.

नियोजन विभाग,मागणी क्र. ओ-९

४५१५, इतर ग्रामविकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च,

१०२-सामुहिक विकास-पंचवार्षीक योजनांतर्गत योजना राज्य योजनांतर्गत योजना

(१) बहुउददेशीय कार्यक्रम,(०० )(०१) आमदारांचा स्था. विकास कार्यक्रम (संकेतांक ४५१५००१२)

**जिल्हाधिकारी व सदस्य सचिव,**
**जिल्हा नियोजन समिती, हिंगोली.**

प्रति,

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली

**प्रतीलिपी माहीतीस्तव सादर,**

मा. आ. श्री. राजीव सातव, विधानसभा सदस्य, कळमनुरी

प्रत: NIC, Hingoli

**जिल्हाधिकारी व सदस्य सचिव,**
**जिल्हा नियोजन समिती, हिंगोली.**

**विवरणपत्र "अ"**

(रू. लाखात)

| अ. क्र. | यंत्रणेचे/कामांचे नांव | अंदाजपत्रकीय किमंत | प्रशासकिय मंजुरी दिलेली तरतुद |
|---|---|---|---|
| | **कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, हिंगोली** | | |
| १ | मौ.बिबथर ता. कळमनुरी येथे दलित वस्तीमध्ये सार्वजनिक जागेवर सामाजिक सभागृह बांधणे (विघयो) | २.९१ | **२.९१** |
| २ | मौ.मसोड ता.कळमनुरी अंतर्गत सी.सी.रस्ता करणे २१० मी. (किसन ससाने यांचे घर ते कुंडलिक कळके यांचे घर,दत्तराव तावडे यांचे घर ते लक्ष्मण थिटे यांचे घर,अभिनव सातव यांचे घर ते विठ्ठल काळे ते किसन जांबुतकर यांचे घर) | ३.०९ | **३.००** |
| ३ | मौ. मोरगव्हाण ता.कळमनुरी अंतर्गत सी.सी.रस्ता करणे १६५ मी. (मारोती मंदिर ते जि.प. शाळा) | २.९७ | **२.९७** |
| ४ | मौ. सावंगी भुतनर ता.कळमनुरी अंतर्गत सी.सी.रस्ता करणे ६५ मी. (गंगाधर भुतनर यांचे घर ते प्रल्हाद भोसकर यांचे घर, नारायण भुतनर यांचे घर ते श्यामराव भुतनर यांचे घर) | १.९८ | **१.९८** |
| ५ | मौ.शेनोडी ता.कळमनुरी अंतर्गत सी.सी.रस्ता करणे १२५ मी. (तुकाराम दौलतराव यांचे घर ते सिध्दार्थ पंडित यांचे घर) | २.०८ | **२.००** |
| ६ | मौ.कुंभारवाडी ता.कळमनुरी अंतर्गत सी.सी.रस्ता करणे १०८ मी (रामराव आमले यांचे घर ते दतराव पोफसे यांचे घर,ग्रामपंचायत जवळील रस्ता, रंगराव आमले यांचे घर ते कोंडीबा आमले यांचे घर, बाबुराव मोरे यांचे घर ते फावजी आमले यांचे घर) | २.०८ | **२.००** |
| ७ | मौ. जांभरुन ता.कळमनुरी अंतर्गत सी.सी.रस्ता करणे ११७ मी. (संभाजी इंगळे यांचे घर बाबुराव क्षिरसागर यांचे घर ते दादाराव सोनटक्के यांचे घर) | १.९८ | **१.९८** |
| ८ | मौ. मोरवाडी ता.कळमनुरी अंतर्गत सी.सी.रस्ता करणे १३५ मी. (विश्वनाथ भोसले यांचे घर ते बाबुराव मोरे यांचे घर) | २.९३ | **२.९३** |
| ९ | मौ. कडपदेव ता.कळमनुरी अंतर्गत सी.सी.रस्ता करणे ११५ मी. (रमेश राठोड यांचे घर ते साहेबराव राठोड यांचे घर) | १.९७ | **१.९७** |